पुढारी

# 'पार्टी गेम्स'च्या माध्यमातून माणसाच्या कलागुणांना वाव

पुणे (प्रतिनिधी) : प्रत्येक माणसामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे सुप्त गुण लपलेले असतात. फक्त त्या गुणांकडे आपले लक्ष जात नाही. मात्र, 'पार्टी गेम्स' च्या माध्यमातून या गुणांना वाव मिळून माणसाचे स्वभाव कळण्यास मदत होते, असे मत प्रसिद्ध अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी आज व्यक्त केले.

चैत्राली माजगावकर-भंडारी यांनी लिहिलेल्या 'पार्टीकरिता गंमतजंमत गेम्स' या पुस्तकाचे प्रकाशन सोलापूरकर यांच्या हस्ते करण्यात आले, तर चैत्रालीच्या संकेतस्थळाचे उद्घाटन प्रसिद्ध अभिनेत्री विभावरी देशपांडे हिच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कलारंगचे अध्यक्ष अमित गोरखे, इंद्रायणीचे प्रकाशक श्याम कोपर्डेकर व चैत्राली माजगावकर-भंडारी उपस्थित होते.

सोलापूरकर म्हणाले, 'पार्टी गेम्स' ही संकल्पना पहिल्यांदाच आली असली, तरी खऱ्या अर्थाने ती शाळेपासूनच आयुष्याशी निगडित आहे. फक्त दैनंदिन कामाच्या व्यापात ओळखता येत नाही. माणसाचे स्वभाव कळण्यापासून ते त्यांच्यातील सुप्त कलागुणांना बाहेर काढतानाच एक विरंगुळा देण्याचाही प्रयत्न होतो. 'पार्टीकरिता गंमत जंमत गेम्स' या पुस्तकाच्या माध्यमातूनही तोच विरंगुळा भेटतो. चैत्राली माजगावकर-भंडारी, अमित गोरखे व विभावरी देशपांडे यांचेहीभाषण झाले. सुप्रिया माजगावकर यांनी प्रास्ताविक केले.

लोकसत्ता

# 'पार्टीकरिता गंमतजंमत गेम्स'चे प्रकाशन

चैताली माजगावकर-भंडारी यांनी लिहिलेल्या 'पार्टीकरिता गंमतजंमत गेम्स या पुस्तकाचे प्रकाशन अभिनेते राहुल सोलापूरकर यांच्या हस्ते झाले. इंद्रायणी साहित्याच्या वतीने हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. अभिनेत्री विभावरी देशपांडे, कलारंगचे अध्यक्ष अमित गोरखे या वेळी उपस्थित होते www.chaitali.majgaonkar.com या चैताली माजगावकर यांच्य संकेतस्थळाचेही उद्घाटन या वेळी सोलापूरकर यांच्या हस्ते करण्यात आले आयुष्यातील क्षण अधिक आनंददायी बनविण्यासाठी 'पार्टीकरिता गंमतजंम गेम्स' हे पुस्तक सर्वांना उपयोगी पडेल, असे सोलापूरकर यांनी नमूद केले. स आणि समारंभ महत्त्वाचे असले तरी त्यातील तोचतोपणा नकोसा वाटते अशावेळी चैताली माजगावकर-भंडारी यांचे पुस्तक निश्चितपणे मदतीला येईल असा विश्वास विभावरी देशपांडे यांनी व्यक्त केला. हे पुस्तक नातलग, आप्ते यांच्याबरोबरच्या मैफलीची रंगत वाढविणारे ठरेल, असे त्या म्हणाल्या. लेखिक माजगावकर-भंडारी यांनीही मनोगत व्यक्त केले. सुरेंद्र माजगावकर यां सूत्रसंचालन केले. श्याम कोपर्डेकर यांनी आभार मानले.

लोकमत

# 'पार्टीकरिता गमंत - जंमत गेम्स' प्रकाशित

पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) : इंद्रायणी साहित्यतर्फे चैताली माजगावकर- भंडारी लिखित 'पार्टीकरिता गमंत-जमंत गेम्स' या पुस्तकाचे प्रकाशन प्रसिद्ध अभिनेते राहुल सोलापूरकर यांच्या हस्ते झाले. या वेळी अभिनेत्री विभावरी देशपांडे, कलारंगचे अध्यक्ष अमित गोरखे आदी उपस्थित होते. www. chaitali.majgaonkar.com या संकेतस्थळाचेही उद्घाटन करण्यात आले. आयुष्यातील क्षण आनंददायी बनविण्यासाठी हे पुस्तक सर्वांना उपयोगी पडणार आहे, असे सोलापूरकर यांनी या वेळी सांगितले.